एपीएमसीतील निविदा प्रक्रियेतील कथित भ्रष्टाचाराबाबत कारवाई करा

वार्ताहर

कल्याण, दि.१५- कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती येथील मुख्य बाजार आवारातील एक १३०२.५० चौ. मी. खुली जागा शेती व शेतीपुरक व्यवसायाकरिता तसेच दुसरी १३८५ चौ. मी. खुली जागा जागा पेट्रोल पंपाकरिता जशी आहे तशी २९ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्त्वावर देण्याकरिता सिलबंद पद्धतीने निविदा मागविण्यात आल्या.

ही निविदा प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा आरोप काँग्रेसचे कल्याण पूर्व ब्लॉक अध्यक्ष शकील खान यांनी केला आहे. सदर निविदा व निविदा प्रक्रिया थांबवून निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून या निविदा प्रक्रियेच्या भष्टाचाराशी संबंधित सर्वांची चौकशी होऊन दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निविदेकरिता इसारा रक्कम एक लाख रुपये ही समितीच्या नावाने पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्टद्वारे भरणा करायची आहे.

तसेच सदर जागेकरिता सुरक्षा अनामत रक्कम पंधरा लाख रुपये राष्टीय बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरणा करायचा आहे. तसेच ५ हजार विनापरतावा रोखीने अथवा समितीच्या नावे काढलेल्या पे ऑर्ड/डी.डी. स्वरूपात भरून कोरा निविदा फॉर्म मिळणार आहे. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची सदर निविदा प्रक्रिया ही पुर्णतः बेकायदेशीर असून शासनाने घातलेल्या निविदा प्रक्रियाच्या अटी-शर्तीचा भंग करणारी आहे तसेच मार्जितल्या ठेकेदाराला फायदा करणारी असल्याचा आरोप शकील खान यांनी केला आहे.

निविदा प्रक्रिया पारदर्शी होण्याकरिता त्या ई-टेंडरिंग दवारा करण्याचा नियम अनेक वर्षांपासून शासनाने केलेला आहे. परंतु कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीने सदर निविदा प्रक्रिया ई-टेंडेरिंग द्वारे न करता त्या सीलबंद निविदा मागविल्या. ही संपूर्ण निविदा प्रक्रिया बेकायदेशीर आहे.

भ्रष्टाचाराला चालना देणारी आहे. आपल्या मर्जितल्या ठेकेदाराला फायदा होण्यासाठी जाणीवपूर्वक ही योजना करून सिलबंद पद्धतीने निविदा मागविल्याने या प्रक्रियेच्या भ्रष्टाचाराशी संबंधित सर्वांची चौकशी होऊन दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी शकील खान यांनी पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

वीज दरवाढीचा बोजा सामान्य जनतेला बसणार नाही

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचा दावा

प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ - राज्यात महावितरण वीजवाढीचा दणका देणार असल्याची चर्चा सुरू असतांनाच या दरवाढीचा सामान्य जनतेवर बोझा पडून त्रास होऊ नये अशी पूर्ण काळजी घेतली जाईल, अशी ग्वाही राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी आज नागपुरात दिली.

स्थानिक प्रेसक्लबमध्ये आयोजित पत्रकारांशी वार्तालाप कार्यक्रमात बोलतांना डॉ. राऊत म्हणाले की, यासंदर्भात वीजदरवाढीचा विषय घेऊन जनसुनावणी घेतली जाणार आहे. त्याचबरोबर याच संदर्भात उद्या मंत्रालयात सर्व संबंधितांची मी बैठकही बोलावली आहे. त्यात साधकबाधक चर्चा केली जाईल असे राऊत यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात बाजूच्या राज्यांच्या तुलनेत वीजेचे दर जास्त असल्याचे मान्य करीत त्याला वाढता उत्पादन खर्च ही जबाबदार असल्याचे डॉ. राऊत यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. सौर ऊर्जेसंबंधीही दर कमी कसे राहतील याची काळजी घेतली जाईल असेही ते म्हणाले.

नागपुरात डॉ. आंबेडकरांनी धम्म परिवर्तनाच्या माध्यमातून केलेली क्रांती लक्षात घेता नागपुरात भगवान गौतम बुद्धाची जगातील सर्वात उंच मूर्ती उभारण्याचा आपला मानस आहे. त्याचबरोबर संपूर्ण राज्यात आंबेडकर कॉरिडॉर निर्माण करण्याचेही आपण ठरवले आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

या कॉरिडॉरमध्येच नागपूर शहरातच बुद्धिस्ट थीम पार्क उभारण्याचेही आपण ठरवले आहे.

या निमित्ताने जगभरातील बौद्ध धम्माचे अभ्यासक महाराष्ट्रात येतील ज्यायोगे पर्यटन व्यवसायला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील युती सरकारने केलेल्या खाजगी व्यक्तींच्या नेमणूका रद्द करणे सुरूच आहे. त्यानुसार ऊर्जा खात्यातीलही सर्व खाजगी व्यक्तींच्या अशासकीय नेमणूका रद्द करण्याचे आम्ही ठरवले असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.

या व्यक्तींना राजीनामे देण्यास सांगितले आहे. जे राजीनामे देणार नाही त्यांच्यावर बडतर्फीचा बडगा उगारला जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. गत सरकारमधील अधिकाऱ्यांचे जे गैरप्रकार पुढे आले आहेत त्याचीही चौकशी करण्याचे संकेत डॉ. राऊत यांनी दिले.

डोंबिवलीत प्रायोगिक तत्वावर प्लास्टिकमिश्रित डांबराचा रस्ता

प्रतिनिधी

डोंबिवली, दि. १६-शहरातील रस्त्याची दुरावस्था तसेच पर्यावरण रक्षणासाठी टाकाऊ प्लास्टिकचा वापर करून टिकाऊ रस्ते बनविण्याचा निर्णय कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाने घेतला. आज प्रायोगिक तत्वावर एमआयडीसी मधील डीएनएस बँक ते आईस फक्टरी पर्यत प्लास्टिक मिश्रित डांबराचा रस्ता तयार करण्यात आला.

शहरातील प्लास्टिकची कचऱ्याची समस्या वाढत असून या कचऱ्याची विल्हेवाट लावताना प्रशासनाच्या नाकी नऊ आले आहेत.टाकाऊ प्लास्टिक रस्त्यासाठीच्या डांबरात मिसळून नष्ट करण्याचा प्रयत्न रुद्र फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आला आहे. हे रस्ते टिकाऊ असल्याचा अहवाल मिळाल्याची माहिती घेतल्यानंतर डोंबिवली शहरात प्रायोगिक तत्वावर हा प्रयोग करण्यात आला आहे.पालिका प्रशासनाने प्लॉस्टिक मिश्रीत डांबर वापरुन प्रायोगिक तत्वावर डोंबिवली एमआय डीसीमधील डीएनसी बँक रोड ते आईस फॅक्टरीपर्यंत १५० मीटर रस्ता बनविण्यास महापालिका शहर अभियंता सपना कोळी(देवनपल्ली) यांच्या उपस्थितीत बनविण्यास आज प्रारंभ केला. या रस्त्यासाठी रिसायकलींग केलेले वेस्ट प्लॉस्टिकचा वापर केला. या रस्त्यासाठी वापरलेले प्लॉस्टिक हे रुद्र एनव्हॉरमेंट सोलूशन या संस्थेमार्फत पुरवले. प्लॉस्टिकचा वापर करुन बनविण्यात आलेले रस्ते अधिक टिकावू राहतील आणि प्रायोगिक तत्वावर प्लॉस्टिक वापरून डांबर मिश्रीत रस्ता तयार करण्याचा हा प्रयत्न यशस्वी झाल्यास भविष्यातही यापुढे रस्ते बनविण्यासाठी वेस्ट प्लॉस्टिकचा वापर केला जाईल आणि त्यामुळे प्लॉस्टिकची विल्हेवाट लावणे सोपे होईल.

भिवंडीतील अपघातात एक ठार, एक जखमी

भिवंडी, दि.१६ (वार्ताहर)- भिवंडीत दोन वेगवेगळ्या झालेल्या वाहन अपघातात कॉलेज युवकासह पादचारी महिला कामगार जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.या प्रकरणी पोलिसांनी गुन्हे दाखल करून एका ट्रक चालकास अटक केली आहे.

यातील पहिल्या घटनेत मुंबई नाशिक महामार्गावरील माणकोली ब्रिजजवळ गोदामात सकाळी कामावर जाण्यासाठी निघालेल्या महिलेस अंजूरफाट्याकडे वळण घेणाऱ्या एका ट्रकने जोरदार धडक दिली.त्यामध्ये अपघातात पादचारी कामगार महिला ताई पंडित देवकर ही जागीच ठार झाली.

या घटनेची खबर नारपोली पोलिसांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक पराग भाट यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेऊन सदर महिलेचा मृतदेहाचा पंचनामा करून शव ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. या अपघाताचा गुन्हा दाखल करून ट्रक चालक शशिकांत पांडे यास अटक केली आहे.

तर तालुक्यातील कालवार येथे मोटार सायकलवरून जाणाऱ्या कॉलेज युवकांच्या बाईकला भरधाव अज्ञात वाहनाने आज दुपारी जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात अमय अरुण पाटील याचा जागीच मृत्यू झाला आहे तर त्याच्या पाठीमागे बसलेला मित्र प्रशांत संजय पाटील हा अपघातामध्ये गंभीर जखमी झाला असून त्यास उपचारासाठी काल्हेर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक मोरे विनयभंग प्रकरण; तरुणास अटक

वार्ताहर

नवी मुंबई, दि. १६- पोलीस उपमहानिरीक्षक निशीकांत मोरे यांच्यावर विनयभंगाचा आरोप करणारी व मोरे यांच्यामुळे आत्महत्या करत असल्याची चिठ्ठी लिहून बेपत्ता झालेली पिडीत मुलगी तिच्या ओळखीतील अंकित सिंग (२०)या तरुणासोबत देहरादुन येथे मंगळवारी सापडली. पोलिसांनी अंकित सिंग या तरुणावर अपहरणासह पोक्सो कलमान्वये गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

न्यायालयाने त्याला १२ दिवस पोलीस कोठडी ठोठावल्याचे परिमंडळ-२चे पोलीस उपआयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले.

तळोज्यात राहणारी अल्पवयीन पीडित मुलगी ६ जानेवारी रोजी मध्यरात्री आपल्या ओळखीतल्या अंकित सिंग या तरुणासोबत घरातुन निघून गेली होती. घरातुन जाण्यापुर्वी या मुलीने डीआयजी निशीकांत मोरे यांच्यामुळे झालेल्या मानसिक त्रासातून आत्महत्या करीत असल्याची तीन पानी चिठ्ठी ठेवली. त्यामुळे तळोजा पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करुन या मुलीचा वेगवेगळ्या माध्यमातून शोध सुरू केला. सीसीटीव्हीच्या तपासणीत या मुलीसोबत एक तरुण असल्याची माहिती पोलिसांना सुरुवातीलाच मिळाली होती. त्यानुसार पोलिसांचे पथक या दोघांच्या मागावर होते. सुरुवातीला हे दोघे उत्तर प्रदेशमध्ये गेले. त्यानंतर तेथून ते देहरादुन येथे गेले होते. त्याठिकाणी त्यांनी भाडय़ाने एक खोली घेतली होती.

मागील आठवडाभर पोलिसांचे पथक या मुलीच्या मागावर होते. अखेर ती देहरादुन येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्या मागावर असलेल्या नवी मुंबई पोलिसांच्या पथकाने देहरादुन येथे जाऊन दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर सायंकाळी विमानाने दोघांना मुंबईत आणले. या घटनेतील पिडीत मुलगी अल्पवयीन असल्याने तिला सोबत घेऊन जाणारा तिचा मित्र अंकित सिंग याच्याविरोधात अपहरण व पोक्सो कलमान्वये गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस उपआयुक्त अशोक दुधे यांनी दिली.

अंकित सिंग याला पिडीत मुलीसह तिचे कुटुंबिय चांगले ओळखतात. हे दोघे घरातून निघुन गेल्यानंतर त्यांनी आपले मोबाईल फोन बंद केले. तसेच त्यांनी आपल्या कुटुंबियांशी संपर्क केला नाही. तरीसुद्धा नवी मुंबई पोलिसांच्या पथकाने या दोघांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतल्याचे तसेच पिडीत मुलगी ही सदर घटनेनंतर त्रासात असल्याने व तणावाखाली आल्याने तिला आपण सोबत नेल्याचे आरोपी अंकित सिंग याने पोलीस चौकशीत म्हटल्याची माहिती उपायुक्त दुधे यांनी दिली. दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक निशिकांत मोरे यांनी पाठलाग करुन आपले अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याची पिडीत मुलीने व तिच्या कुटुंबियांनी केलेली पार खोटी असुन त्याबाबतचे कुठलेही पुरावे सापडले नाही.

सरन्यायाधीश शरद बोबडे यांचा उद्या नागपुरात नागरी सत्कार

प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ - नागपूरचे सुपुत्र आणि सध्या विधी क्षेत्रात देशाच्या सर्वोच्च पदी विराजमान झालेले सरन्यायाधीश शरद बोबडे यांचा नागपूर महानगरपालिकेच्या वतीने १८ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृहात नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन, महामार्ग आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात येईल. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील. राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख, ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. नितीन राऊत, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री सुनील केदार, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश न्या. रवी देशपांडे यांची उपस्थिती राहील. विशेष अतिथी म्हणून विधानसभेतील विरोधी पक्ष नेते तथा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महापौर संदीप जोशी भूषवतील.

या भव्यदिव्य नागरी सत्कार कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मार्गदर्शन समिती आणि आयोजन समितीचे गठन करण्यात आले आहे. मार्गदर्शन समितीमध्ये सेवानिवृत्ती न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, खासदार विकास महात्मे, खा. कृपाल तुमाने, आ. गिरीश व्यास, आ. अनिल सोले, आ. नागो गाणार, आ. जोगेंद्र कवाडे, आ. प्रकाश गजभिये, आ. कृष्णा खोपडे, आ. विकास कुंभारे, आ. मोहन मते, आ. विकास ठाकरे, आ. डॉ. परिणय फुके, विभागीय आयुक्त डॉ. संजीव कुमार, पोलिस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय, जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे, यांचा समावेश आहे. आयोजन समितीमध्ये शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचा समावेश आहे.

भारत निर्णायकतेवर भर देणार-जयशंकर

नवी दिल्ली, दि. १६ (वृत्तसंस्था)- भारताचा मार्ग हा विध्वसंक नसून तो तटस्थतेपेक्षा निर्णायक भूमिकेवर भर देणारा आहे, असे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी सांगितले.

रायसीना संवादात ते बोलत होते. ते म्हणाले की भारत-प्रशांत क्षेत्रात भारताने मोठी भूमिका पार पाडावी अशी अनेक देशांची अपेक्षा आहे. भारताने कधीच व्यापारी तसेच उथळ दृष्टिकोन अवलंबलेला नाही.

इराण व अमेरिका यांच्यातील संघर्षांबाबत ते म्हणाले की, यात सरतेशेवटी काय होणार हे त्या दोन देशांवरच अवलंबून आहे.

चीनच्या मुद्द्यावर ते म्हणाले की, दोन्ही देशांमध्ये महत्त्वाच्या विषयांवर मतैक्य गरजेचे आहे. भारत किंवा चीन या दोन्ही देशांना संबंध बिघडवून चालणार नाहीत कारण ते खूपच वेगळ्या स्वरूपाचे आहेत. प्रत्येक देश जगाला एकाचवेळी सामोरा जात आहे.

त्यामुळे दोन्ही देशात समतोल असणे गरजेचे आहे. भारत आता त्याच्या पूर्वीच्या प्रतिमेचा बंदी राहिलेला नाही. त्यातून तो बाहेर पडत आहे. भारताची भूमिका ही विध्वंसक नाही, भारत व्यापारी वृत्तीचाही नाही.

दावडी येथे भंगार गोदामाला आग

डोंबिवली, दि १६ (वार्ताहर)- डोंबिवली जवळ असलेल्या दावडी येथील भंगार गोदामाला पहाटे ५ च्या सुमारास अचानक आग लागली.

पहाटे वारे असल्याने व वायर ,पुठ्ठे असल्याने आगीने रौद्र स्वरूप घेतले त्यात दोन गोदामे पूर्णपणे आगीत भस्मसात झाली असून सुदैवाने कोणी जखमी झाले नाहीत.

आगीचे वृत्त समजताच डोंबिवलीतील ४ आगीचे बंब सुरेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दाखल झाले गोदामात वायर ,पुठ्ठे ,आदी साहित्य होते.

आगीचे नक्की कारण समजू शकले नसले तरी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी असा अंदाज आहे संपूर्ण दोन गोदामे आगीत खाक झाली असली तरी कोणी आतमध्ये नसल्याने जखमी झाले नाही, अशी माहिती फायर अधिकारी सुरेश शिंदे यांनी दिली

गोदाम जेथे बांधले ती जागा रमेश जोशी यांची असून संतोष मोर्या व एक साथीदार याची गोदामाची मालकी असल्याचे सांगण्यात आले मानपाडा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

महामेट्रोकडून भारत वन येथील रस्त्याचा प्रस्ताव रद्द

नागपूर, दि.१६ (प्रतिनिधी)- महामेट्रोकडून नागपूरच्या भारत वन क्षेत्र येथील सुमारे अर्धा किलोमीटर लांब रस्त्याचा प्रस्ताव रद्द केला आहे. यामुळे भारत वनातील मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड थांबणार आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे पर्यावरण प्रेमींसह भारत नगर येथील नागरिकांत आनंदाचे वातावरण आहे.

भारत वन क्षेत्रातील अर्धा किलोमीटरच्या रस्त्याचा प्रस्ताव रद्द नागपूरच्या पश्चिम भागातील भारत वन हे भारत नगरच्या शेजारी आहे. शहरातील मोठे जंगल म्हणूनही याची ओळख आहे. अडीच किलोमीटर किलोमीटर लांब व एक किलोमीटर पेक्षाही जास्त विस्तीर्ण असा या जंगलाचा परिसर आहे. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या या नैसर्गिक जंगलात ३२ प्रकारचे वृक्ष व १३८ प्रकारच्या पक्षांचा अधिवास आहे. जंगलाच्या शेजारील फुटाळा तलावाचा विकास करण्याचे प्रशासनाने ठरवले. या तलावाच्या विकास कामांमुळे भारत वनमधून रस्ता प्रस्तावित करण्यात आला. अर्धा किलोमीटर लांब व १८ मीटर रुंदीच्या या रस्त्याच्या बांधकामामुळे या वनातील जैव विविधतेला धोका उत्पन्न झाला होता. रस्त्याकरता जंगलातील ५५८ झाडांची कत्तल करण्यात येणार होती. मात्र, पर्यावरणप्रेमी व स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पाला कडाडून विरोध केल्याने रस्त्याचा प्रस्ताव प्रशासनाने आता रद्द केला आहे.वृक्षतोड करून भारत वनातून रस्त्याच्या प्रस्तावाला पर्यावरणप्रेमी व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला होता.

गेले वर्षभर यासाठी विविध आंदोलनेही करण्यात आली. नागरिकांचा होणारा विरोध लक्षात घेता महामेट्रो, महापालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात झालेल्या संयुक्त बैठकीत रस्ता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर पर्यावरणप्रेमी व नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. प्रस्तावित रस्त्यामुळे वन संपदेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार होते. वनसंपदेने समृद्ध असलेल्या भारत वनावर संकट आले होते. आता रस्ता रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने नागरिक व पर्यावरण प्रेमींच्या लढ्याला यश प्राप्त झाले आहे.

पतीने पत्नीला खलबत्त्याने ठेचून ठार केले

नागपूर, दि. १६ (प्रतिनिधी)- संशयित पतीने आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्या डोक्यात लोखंडी बत्त्याने वार करून हत्या केल्याची घटना नागपूरजवळील वाडी परिसरात घडली. या प्रकरणी वाडी पोलिसांनी आरोपी सिद्धार्थ प्रेम सोनपिपळे याला अटक केली आहे.

अलका सोनपिंपळे (वय २८) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव असून सिद्धार्थ प्रेम सोनपिंपळे (वय ३५) असे मारेकऱ्याचे नाव आहे.

सिद्धार्थ एमआयडीसीतील कंपनीत पेंटिंगचे काम करतो. त्याची पहिली पत्नी अपत्यांसह वेगळी राहते. अलकाही विवाहित होती. तीन महिन्यांपूर्वी तिची सिद्धार्थ याच्यासोबत ओळख झाली. ती पहिल्या पतीला सोडून सिद्धार्थ याच्यासोबत 'लिव्ह इन'मध्ये राहायची. मंगळवारी रात्री अलका घरुन निघाली. गुरुवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास ती घरी परतली. रात्रभर गायब असल्याने सिद्धार्थ याने तिला जाब विचारला. दोघांमध्ये वाद झाला.

दुपारी सुमारास पुन्हा दोघांमध्ये वाद झाला. तू रात्रभर कुठे गेली होती अशी विचारणा सिद्धार्थने केली. त्यावर तिने समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे संतप्त झालेल्या सिद्धार्थने घरातील स्वयंपाकघरात असलेला लोखंडी खलबत्त्यातील बत्ता उचलला आणि अलकाच्या कपाळावर मारला. त्याने पत्नीच्या डोक्यावर व पोटावर लाथा मारून तिला ठार केले.

epaper.freepressjournal.in

जोस्टस् इंजिनीअरिंग कंपनी लिमिटेड

सीआयएन क्र. : एल२८१००एमएच१९०७पीएलसी०००२५२
नोंद. कार्यालय : ग्रेट सोशल बिल्डिंग,
६० सर फिरोझशाह मेहता रोड, मुंबई- ४००००१
दूर. क्र. ९१-२२-६२३७८२००,
फॅक्स : ९१ -२२-६२३७८२०१
वेबसाईट : www.josts.com, ईमेल: jostsho@josts.in

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७(१)(ए) अनुसार याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचा अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी गुरुवार, ६ फेब्रुवारी, २०२० रोजी घेण्यात येणार आहे.

यापुढे, वर नमूद रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ४७(२) नुसार सदर सूचना ही दी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेडच्या (www.bseindia.com) वेबसाईट्स वर उपलब्ध आहे.

जोस्टस् इंजिनीअरिंग कंपनी लिमिटेडसाठी
सही/-
प्राजक्ता पाटील
कंपनी सचिव करिता

ठिकाण : मुंबई
दिनांक : १६/०१/२०२०

HAZOOR MULTI PROJECTS LIMITED

सीआयएनः एल९९९९९एमएच१९९२पीएलसी२६९८१३
नोंद. कार्यालयः ६०१-ए, रामजी हाऊस प्रिमायसेस
को-ऑप. सोसायटी लि., ३०, जांबुळवाडी,
जे. एस. एस. रोड, मुंबई-४०० ००२.
टेलिफॅक्सः ९१-०२२ २२०००५२५
ईमेलः hmpl.india@gmail.com
वेबसाईटः www.hazoormultiproject.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ आणि रेग्युलेशन ३० सहवाचता रेग्युलेशन २९ अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीकरिता कंपनीच्या अलेखापरीक्षित अलिपत वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात, मंजूर करण्यासाठी आणि पटलावर घेण्यासाठी ६०१-ए, रामजी हाऊस, ३०, जांबुळवाडी, जे.एस.एस. रोड, मुंबई-४०० ००२ येथे शुक्रवार, २४ जानेवारी, २०२० रोजी दु. ४.०० वा. घेण्यात येणार आहे.

सदर सूचना ही कंपनीच्या वेबसाईट www.hazoormultiproject.com यावर आणि तसेच स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट www.bseindia.com यावर उपलब्ध आहे.

हजूर मल्टी प्रोजेक्टस् लिमिटेड करिता
सही/-
(दिनेश कुमार अग्रवाल)
संचालक
ठिकाणः मुंबई
दिनांकः १६ जानेवारी, २०२०

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. सुभाष विष्णूदास शेठ** जे **पंचवटी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., एस. व्ही. रोड, कांदिवली (प), मुंबई-४०००६७** चे सभासद आहेत आणि सोसायटीमधील **कार्यालय क्र. १०, पहिला मजला**चे धारक आणि धारक क्र. १११ ते ११५ प्रत्येकी रु. ५०/- चे पाच शेअर्सचे धारक असून ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी निधन पावले. त्यांचा मुलगा **डॉ. उत्पल शेठ** यांनी मूळ चा तपास लागत नसल्याने शेअर प्रमाणपत्राची प्रतिलिपी जारी करण्यासाठी विनंती केली आहे. **मयत सुभाष शेठ** यांनी माझे नामनिर्देशन केले नाही.

याद्वारे सूचना देण्यात येते की, सर्व व्यक्ती ज्यांना मयत सभासदाचे सदर शेअर्स आणि हितसंबंधाचे प्रस्तावित हस्तांतर होण्यास आक्षेप किंवा शेअर प्रमाणपत्रात कोणताही दावा असल्यास त्यांनी निम्नस्वाक्षरीकारांना कोणतेही दावे किंवा आक्षेप या सूचना प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ दिवसांच्या** आत पाठवावे, कसूर केल्यास सोसायटी या प्रकरणात अचूक कृती करण्यास मोकळी असेल.

पंचवटी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडच्या वतीने आणि करिता
सही/-
(श्री. इंद्रजीत सचदेव)
सन्मा. सचिव
ठिकाण: मुंबई दिनांक:१७.०१.२०२०

जाहीर सूचना

दिवंगत श्री. जोक्वीम हरमानो फर्नांडिस त्यांच्या कालकिर्दीत त्यांची पत्नी श्रीम. जेरालडाईन ए. फर्नांडिस यांच्यासह उद्यान ३ को-ऑप. हा. सो. लि., ऑफ मिलीटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०७२ येथील संयुक्त सभासद होते व शेअर धारक होते व फ्लॅट क्र. बी-५०३, ५ वा मजला, उद्यान ३ को-ऑप. हा. सो. लि., ऑफ मिलीटरी रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०७२ येथील व विभिन्न क्र. १५६ ते १६० धारक (दोन्ही समाविष्ट) शेअर प्रमाणपत्र क्र. १३१ धारक रु. ५०/- प्रत्येकीच्या त्यांचे नावे पाच शेअर्सचे धारक आहेत व श्री. जोक्वीम हरमानो फर्नांडिस हे मुंबई येथे दि. १८.०६.२०१८ रोजी मयत झाले आता त्यांची पत्नी श्रीम. जेरालडाईन ए. फर्नांडिस यांच्या अहवालावरून अन्य वारस यांच्याकडून सोसायटीच्या कायदा क्र. ३५ अंतर्गत व उद्यान ३ को-ऑप. हा. सो. लि. यांच्या विनंती वरून सदर फ्लॅटमधील तसेच सदर शेअर्समधील सदर ५०% अविभाजीत शेअर्सचे हस्तांतरण करण्याकरिता अर्ज केला आहे व त्यांच्या नावे रद्द केल्यानंतर त्यांचे पती दिवंगत जोक्वीम हरमानो फर्नांडिस यांचे नाव विशेष सभासद म्हणून दाखल करत आहेत.

कोणाही व्यक्तीस वा वित्तीय संस्था यांना सोसायटीच्या सदर हस्तांतरणाकरिता कोणतेही दावे, आक्षेप, हक्क, कायदेशीर कारवाई काही असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप व/वा दावे सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखोपासून १५ दिवसांच्या आत दाखल करावे.

मुंबई दि. १७ जानेवारी, २०२०
सन्मा. सचिव
उद्यान ३ को-ऑप. हा. सो. लि.
यांच्याकरिता

पंजाब नैशनल बैंक punjab national bank

सर्कल ऑफिस वसुली विभाग, मेकर टॉवर ''एफ'' विंग, ७ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५ **फोन क्र.** २२१६३४५८, २२१८२४२३

शुद्धिपत्र

कृपया दिनांक १७.०२.२०२० आणि १८.०२.२०२० रोजीच्या लिलावासाठी फ्री प्रेस जर्नल, नवशक्ती, बिझनेस स्टॅण्डर्ड नवराष्ट्र, गुजरात गार्डियन मध्ये ०८.०१.२०२० रोजी प्रकाशित दिनांक ०८.०१.२०२० रोजीच्या १७ मिळकतींच्या विक्री सूचनेसाठी टिप घ्यावी. लिलावाची साईट ही
https://etender.pnbnet.in:8443/banks/detail/pnb/MTQy to
https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp.Start अशी बदलण्यात आली आहे. बोलीदार https://www.ibapi.in, भेट देऊ शकतात. जेथे एज्युकेशनल व्हिडिओसह बोलीदारांसाठी मार्गदर्शक तत्वे उपलब्ध आहेत. बोलीदारांनी पुरेशा आधी खालील औपचारिकता पूर्ण करायच्या आहे.

टप्पा १ : बोलीदार/खरेदीदार नोंदणी : बोलीदारांनी त्यांचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी वापरून ई-लिलाव पोर्टल (लिंक वर दिलेली) http:www.mstcauctions.com वर नोंदणी करायची आहे.

टप्पा २ : केवायसी पडताळणी : बोलीदारांनी आवश्यक केवायसी दस्तावेज अपलोड करायचे आहेत. केवायसी दस्तावेज ई-लिलाव सेवा पुरवठादारांद्वारे पडताळणी करण्यात येतील. (२ कामकाजाचे दिवस लागू शकतात)

टप्पा ३ : त्याच्या ग्लोबल इएमडी वॉलेटकडे इअर रकमेचे हस्तांतर : एनईएफटी/ट्रान्सफर वापरून, ई-लिलाव पोर्टल वर चलन जनरेटेड वापरून फंडचे हस्तांतर ऑनलाईन/ऑफलाईन.

टप्पा १ ते ३ ई-लिलावाच्या तारखेपूर्वी पुरेशा आधी बोलीदाराने पूर्ण करायची आहे. बोलीदार नोंदणी आणि बोली मार्गदर्शनाकरिता **https:www.ibapi.in** ला सुद्धा भेट देऊ शकता.

कोणत्याही स्पष्टिकरणासाठी संबंधित शाखा/सर्कल ऑफिसला भेट द्यावी.

प्राधिकृत अधिकारी
पंजाब नॅशनल बँक

TATA POWER

दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
(कॉर्पोरेट काँट्रॅक्टस् डिपार्टमेंट)
२रा मजला, सहार रिसिव्हिंग स्टेशन, हॉटल लीलाजवळ
अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०५९. महाराष्ट्र, भारत.
बोर्ड लाईन : ०२२-६७१७३९१७)
सीआयएन:एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७

निविदा निमंत्रणाची सूचना

दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड खालील पॅकेजेससाठी पात्र विक्रेत्यांकडून निविदा मागवत आहे. (दोन भागात बोली)

भिरा, भिवपुरी आणि खोपोली येथील हायड्रो जनरेटिंग स्टेशनसाठी खालील नमूद ऑईल फिल्ड ट्रान्सफॉर्मर्सचे आरेखन, पुरवठा, उभारणीचे पर्यवेक्षण आणि सुरू करण्यासाठी आऊटलाईन अॅग्रीमेंट
(पॅकेज संदर्भ सीसी२०एबीके००४)
ए. १०००केव्हीए, २२केव्ही/४३३व्ही-१ नग
बी. ५००केव्हीए, २२केव्ही/४३३व्ही-३ नग
सी. २५०केव्हीए, २२केव्ही/४३३व्ही-१ नग
डी. ३१५केव्हीए, ११केव्ही/४३३व्ही-१ नग
ई. २००केव्हीए, ११केव्ही/४३३व्ही-४ नग

तपशिलवार एनआयटीसाठी, कृपया वेबसाईट **https://www.tatapower.com** वरील निविदा अनुभागाला भेट द्या. इच्छुक बोलीदारांनी सोमवार, २७ जानेवारी, २०२० रोजी दु. ३.०० पूर्वी निविदा शुल्क आणि प्राधिकृती पत्र सादर करावे.

माँ जगदंबा ट्रेडलिंक्स् लिमिटेड

सीआयएनः एल७४९९९एमएच१९८५पीएलसी०३५१०४
गाळा क्र. १, तळ मजला, अंजिक्यतारा कंपाऊंड, बासरा स्टुडिओ जवळ, रोड क्र. २, सिंग इस्टेट, समता नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१. **फोनः** ८६५५१२११४४,
ईमेलः maajagdambelinksltd@gmail.com, **वेबसाईटः** www.maajtl.com

इजीएमची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माँ जगदंबे ट्रेडलिंक्स लिमिटेड च्या सभासदांची अतिरिक्त सर्वसाधारण सभा ही पुढील कामकाज

१. महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथून ठाणे येथे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय स्थलांतर

यासाठी गाळा क्र. १, तळमजला, अजिंक्यतारा कंपाऊंड रोड क्र. २, सिंग इस्टेट, समता नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१ येथे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात गुरुवार, २३ जानेवारी, २०२० रोजी घेण्यात येणार आहे.

सदर कंपनी त्यांच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यामा (ई-व्होटींग) द्वारे मंजूर प्रस्तावित ठरावांवर त्यांचा मतदानाचा हक्क वापरण्याची सुविधा पुरवित आहेत.

सदर मतदान कालावधी हा < जानेवारी २०, २०२० (स. ९.००)> ला सुरु होऊन < जानेवारी २२, २०२० (सायं. ५.००)> वा. बंद होईल. प्रत्यक्ष स्वरुपात किंवा डिमटेरियलाईडच्या स्वरुपात धारण केलेले कंपनीचे शेअरधारक हे या कालावधीत <जानेवारी १६, २०२०> ची कट ऑफ तारखेस (रेकॉर्ड तारीख) त्यांची मत इलेक्ट्रॉनिकली नोंदवू शकतात. यानंतर मतदानाकरिता सीडीएसएल द्वारा ई-मतदान बंद करण्यात येतील.

माँ जगंदबा ट्रेडलिंक लिमिटेडकरिता
पवनकुमार चौधरी
डीआयएनः०३१२५८०६। संचालक

जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते की आम्ही खालील परिशिष्टात अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या मिळकतीच्या ("मिळकत") संदर्भात श्री. किरीट वोरा आणि श्री. शैलेश वोरा ("मालक") यांच्या नामाधिकारांची तपासणी करीत आहोत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीस सदर मिळकतीच्या विरोधात/वर/त्यासंदर्भात/करिता विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, वारसा, कब्जा, जप्ती, गहाण, प्रभार, भेट, प्रलंबित वाद किंवा अन्य कोणत्याही प्रकारे किंवा कसेहीच्या मार्गे कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप असल्यास तशी लिखित सूचना झुंजारराव अॅण्ड कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१ यांना तसा अस्तित्वात असलेला हक्क, नामाधिकार, हितसंबंध, दावा, मागणी किंवा आक्षेपाच्या पुरक दस्तावेजांच्या प्रमाणित मूळ प्रतींसह सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नाही असे गृहित धरले जाईल आणि जर कायद्यात कोणताही दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात असल्यास दावेदाराने तसा दावा, मागणी किंवा आक्षेप सोडून दिल्याचे आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेप वापराचा कोणताही हक्क त्यागित असल्याचे मानले जाईल आणि कोणताही तसा दावा किंवा आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक नसेल.

परिशिष्ट

तळमजला मोजमापित अंदाजे २२० चौरस फूट (बिल्ट अप क्षेत्र), लिबर्टी गार्डन हाऊसिंग कॉलनी, मालाड (प), मुंबई-४०००६४ वरील गॅरेज आणि तळ मजला मोजमापित १२२६ चौरस फूट (बिल्ट अप क्षेत्र), पहिला मजला मोजमापित १२३२ चौरस फूट (बिल्ट अप क्षेत्र), दुसरा मजला मोजमापित १२७३ चौरस फूट (बिल्ट अप क्षेत्र) चे समाविष्टित त्यावर उभ्या 'सौरभ' अशा ज्ञात बंगल्यासह एकत्रित गाव मालाड, तालुका-बोरिवली, जिल्हा-मुंबई उपनगर जिल्ह्याचे मोजमापित ४०१.३४ चौरस मीटर्स, सी.टी.एस क्र. ४७, प्लॉट क्र. ९० धारक जमिनीचे ते सर्व भाग आणि विभाग.

झुंजारराव अॅण्ड कं. करिता
सही/-
विक्रांत झुंजारराव

मुंबई,
दिनांक : १७ जानेवारी, २०२०

पिगॅसस अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

५५-५६, ५ वा मजला, फ्री प्रेस हाऊस, नरिमन पॉईंट,
मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी क्र. : ०२२ - ६१८८ ४७००
ई-मेल : sys@pegasus-arc.com युआरएलः www.pegasus.arc.com

ई-लिलाव विक्रीकरिता जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) ला परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मिळकतींची विक्री.

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार व जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील नमूद स्थावर मिळकती ह्या सरफैसी अॅक्टच्या तरतुदींन्वये दिनांक **३०/०६/२०१७** रोजीच्या अभिहस्तांकन कराराद्वारे अभुदय को-ऑपरेटिव्ह बँक लि.द्वारे त्यातील तारणा हितसंबंधासह खालील नमूद कर्जदाराची थकबाकी अभिहस्तांकित केलेल्या अशा पिगॅसस ग्रुप थर्टी टु ट्रस्ट-I (पिगॅसस) चे विश्वस्त म्हणून त्यांच्या क्षमतेत कृती करणाऱ्या पिगॅसस अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (पिगॅसस) अशा तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत. उपरोक्त अभिहस्तांकन करारान्वये अभ्युदय कॉ-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील नमूद गहाण मिळकीच्या प्रत्यक्ष कब्जा तारण धनकोचे प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे सोपविला आहे. आणि ती मे. दया बिल्डर्स, श्री. धनसुख डी. शाह, श्री. विजय डी. शाह, श्री. किरीट डी. शाह, श्री. हरेश डी. शाह आणि श्री. किरण डी. शाह यांचेकडून पिगॅसस अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडला थकीत **३०/०४/२०१४ रोजीची रु. ९,७७,२१,९३७.५०/- (रुपये नऊ कोटी सत्त्याहत्तर लाख एकवीस हजार नऊशे सदोतीस आणि पन्नास पैसे मात्र)** अधिक त्यावरील खर्च, परिव्यय, संविदात्मक दराने व्याज थकीत वसुली पर्यंत वसुलीसाठी सदर गहाण मिळकत ०४/०२/२०२० रोजी ''जसे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे. राखीव किंमत **रु. १९,९१,१७,०००/-** (रुपये एकोणीस कोटी एक्याण्णव लाख सतरा हजार मात्र) राहील आणि इसारा अनामत रक्कम **रु. १,९९,११,७००/-** (रुपये एक कोटी नव्याण्णव लाख अकरा हजार सातशे मात्र) राहील.

विक्री करावयाच्या स्थावर मिळकतींचे वर्णन

कर्जदार/ हमीदारांचे नाव	**मे. दया बिल्डर्स** **श्री. धनसुख डी. शाह** **श्री. विजय डी. शाह, श्री. किरिट डी. शाह** **श्री. हरेश डी. शाह, श्री. किरण डी. शाह**
देय थकबाकी	**३०/०४/२०१४ रोजीस रु. ९,७७,२१,९३७.५०/- (रुपये नऊ कोटी सत्त्याहत्तर लाख एकवीस हजार नऊशे सदोतीस आणि पन्नास पैसे मात्र)** च्यासह ०१/०५/२०१४ पासून पुढील व्याज, अधिक रक्कम, प्रभार आणि खर्च.
स्थावर मिळकतीचे वर्णन	गाव मालाड (पू.), गोकुळधाम, गोरेगाव (पू.), मुंबई-४०० ०६३ च्या सीटीएस क्र. ६५८/ए धारक सर्व्हे क्र. २६२, हिस्सा क्र. १, २ आणि ३ धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधकामित किंवा बांधकाम चालू असलेली २ स्टोरिज बिल्डिंग अधिक बेसमेंट तळ मजला समाविष्टीत दया सरिता सी अशा नावाची संपूर्ण बिल्डिंग. मोजमापित एकूण १४८५२ चौ. फूट बिल्टिअप क्षेत्र. खालीलप्रमाणे सिमाबध्दः पूर्वेस आणि त्या दिशेनेः दया सरिता 'बी' विंग, पश्चिमेस आणि त्या दिशेनेः दयासागर बिल्डिंग, उत्तरेस आणि त्या दिशेनेः प्लॉट स.क्र. २६१ (भाग), दक्षिणेस आणि त्या दिशेनेः दयासरीता 'ए' विंग.
सीइआरएसएआय	अॅसेट्स आयडी- २०००७८३७७३८
राखीव किंमत	रु. १९,९१,१७,०००/-
इसारा अनामत रक्कम (राखीव किंमतीच्या १०%)	रु. १,९९,११,७००/-
मिळकतीवर करण्यात आलेले कोणतेही दावे आणि तारणी धनकोंना ज्ञात असलेली अन्य कोणतीही थकबाकी व मूल्य	ज्ञात नाही
मिळकतीचे निरीक्षण	२४/०१/२०२० रोजी दु. ३.०० ते सायं. ५.०० दरम्यान संपर्क क्र. ९६१९४२२२०९/ ९६९९५३४९९९
बोली सादर करण्यासाठी अंतिम तारीख	०३/०२/२०२० रोजी सं. ४.०० पर्यंत
बोली उघडण्याचे ठिकाण आणि वेळ	ई- लिलाव/बोली वेबसाईट (**https://sarfaesi.auctiontiger.net**) मार्फत **०४/०२/२०२०** रोजी स. ११.०० पासून दु. १.०० पर्यंत

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींकरिता, कृपया ई-लिलावात भाग घेण्यासाठी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी इतर तपशील आणि संबंधित मिळकतीच्या ई-लिलाव/विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींकरिता तारण धनकोंची वेबसाईट म्हणजेच **http://www.pegasus-arc.com/assets-to-auction.html** मध्ये दिलेली लिंक पाहावी. बोलीदार वेबसाईट **https://sarfaesi.auctiontiger.net** ला देखील भेट देऊ शकतात किंवा **सेवा पुरवठादार** मे. ई-प्रोक्युरमेंट टेक्नॉलॉजीज लि., ऑक्शन टायगर, अहमदाबाद (हेल्पलाईन नं. ०७९-६१२००५४६/५११; संपर्क व्यक्ती : श्री. तिलक मराठा, मोबाईल क्र. +९१-६३५१८९६८३२, ई-मेल : **tilak@auctiontiger.net**, श्री. आकाश कऱ्हे, मोबाईल क्र. +९१-९८३३३९८५४७, ई-मेल : **akash.karhe@auctiontiger.net** येथे संपर्क साधावा.

प्राधिकृत अधिकारी
पिगॅसस अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
(पिगॅसस ग्रुप थर्टी टु ट्रस्ट-I चे विश्वस्त)

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७/०१/२०२०